# <u>मुस्लिम वारसा विषयक सर्वसाधारण नियम</u>

मुस्लिम कायदा हा मुस्लिम धर्मियांचा व्यक्तिगत कायदा असून तो जगभरातील मुस्लिम धर्मियांसाठी लागू आहे.

मुस्लिम कायद्याचे प्रमूळ उगम स्त्रोत चार आहेत. (१) कुराण, (२) सुन्ना, (३) इजमा, (४) कियास.
याशिवाय इतिहसन, इतिलाह, रुढी, परंपरा, राष्ट्रीय कायदे ही दुय्यम उगम स्त्रोत आहेत.

मुस्लिम कायद्यान्वये मुस्लिम समाजात प्रामुख्याने दोन शाखा आहेत (१) शिया (२) सुन्नी.

मुस्लिम समाजात लग्न (निकाह), घटस्फोट (तलाक), मेहर (लग्नाआधी नवरदेवाने नवऱ्या मुलीला देण्याची रक्कम), बक्षीस पत्र (हिबा), मृत्यूपत्र (वसियतनामा), वारसा हक्क, पालनपोषण, अज्ञान पालकत्व, वक्फ आदी सर्व बाबी मुस्लिम कायद्यान्वये पार पाडल्या जातात. मुस्लिम व्यक्तीमार्फत न्यायालयात दाखल दाव्यातही मुस्लिम कायद्यान्वये प्रकरण चालवले जाते.

ब्रिटिश राजवटीत मुस्लिमांसाठी काही कायदे केले गेले. त्यातील शरियत ॲक्ट-१९३७ हा कायदा महत्वाचा आहे.

* शरियत ॲक्ट-१९३७: हा कायदा ७ ऑक्टोबर १९३७ रोजी अंमलात आला. याला मुस्लिम धर्मियांचा व्यक्तिगत कायदा असे म्हटले आहे. या कायद्यातील कलम २ अन्वये, रुढी व परंपरा विरुध्द असली तरी शेत जमीन सोडून इतर अन्य बाबी जसे वारसा हक्क, स्त्रीची विशेष संपत्ती, निकाह, तलाक, उदरनिर्वाह, मेहर, पालकत्व, बक्षीस, न्यास, न्यासाची मालमत्ता, वक्फ या सर्व बाबी मुस्लिम व्यक्तिगत कायदान्वये ठरविल्या जातील.
त्यासाठी असलेल्या अटी म्हणजे (१) व्यक्ती मुसलमान असावी (२) भारतीय करार कायद्यातील कलम ११ अन्वये व्यक्ती करार करण्यास सक्षम असावी. (३) हा कायदा ज्या प्रदेशात लागू पडतो त्या प्रदेशातील रहिवासी असावी.

हिंदु उत्तराधिकार अधिनियम, १९५६च्या तरतुदी मुस्लिम धर्मियांना लागू होत नाहीत. त्यांच्या मिळकतीचे वारस मुस्लिम व्यक्तीगत (पर्सनल लॉ) कायद्यातील तरतुदीप्रमाणे ठरविले जातात.
मुस्लिमांच्या वैयक्तिक कायद्याप्रमाणे हनाफी सुन्नी आणि शिया अशा दोन्ही पंथांचे वारसाविषयीचे वेगवेगळे नियम आहेत.

मुस्लिम वारसा हक्क कायदा हा चार इस्लामिक कायद्यांचा संग्रह आहे.
(१) पवित्र कुराण
(२) सुन्नी (प्रेषिताला मानणारे)
(३) इज्मा (एका ठराविक मुद्द्यावर निर्णय घेतांना समाजातील सुशिक्षीत लोकांचा विचार घेणारे)
(४) क्विया (देवाने जे चांगले आणि योग्य ठरवून दिले आहे त्याच सुधारणा करणारे).

मुस्लिम व्यक्तीगत कायद्याप्रमाणे वारसाविषयक सर्वसाधारण नियम खालीलप्रमाणे आहेत.

⁕ **वारस योग्य संपत्ती** : मृत मुस्लिम व्यक्तीचा अंत्यविधीचा खर्च आणि त्याचे कर्ज भागवल्यानंतर जे उरेल त्या संपदेचे वाटप/ विभागणी करण्यात येते.

⁕ **अमान्य संकल्पना :**

✓ इंग्रजी कायद्यात असलेला 'स्थावर संपत्ती' व 'जंगम संपत्ती' असा भेद मुस्लीम कायद्यात केला जात नाही.

✓ हिंदू कायद्यामध्ये असलेला 'वडिलोपार्जित संपत्ती' आणि 'स्वसंपादित संपत्ती' असा भेद मुस्लीम कायद्यात नसतो.

✓ मुस्लीम कायद्यात संयुक्त किंवा एकत्र कुटुंब ही संकल्पना नसते. मुस्लीम व्यक्तीची सर्व प्रकारची मालमत्ता त्याच्या एकट्याच्या मालकीची असते व तो मृत झाल्यावर तिच्या वारसदाराकडे त्यांच्या हिश्याप्रमाणे प्रक्रांत होते.

✓ मुस्लीम कायद्याला 'जन्मसिद्ध अधिकार' मान्य नाही. मुसलमान व्यक्तीचा वारसाधिकार पूर्वस्वामीच्या मृत्युनंतरच निर्माण होतो. पूर्वस्वामी जीवंत असतांना केवळ जन्मामुळे कोणालाही त्या पूर्वस्वामीच्या संपत्तीत काहीही हितसंबंध निर्माण होत नाहीत तसेच संभाव्य उत्तराधिकाराचे हस्तांतरण निरर्थक ठरते.

✓ मुस्लिम कायद्याला प्रतिनिधीत्वाचे तत्व मान्य नाही, मात्र याबाबतीत शिया आणि सुन्नी यांच्या नियमात फरक आहे. वारस मृत्यूच्यावेळी ठरतात.

⁕ **वारसाधिकार :** मुस्लिम कायद्यान्वये स्त्रियांना वारसाधिकार मिळतो. मात्र नात्याच्या दृष्टीने एकाच स्तरावरील स्त्री-पुरुषाला स्त्रीच्या दुप्पट हिस्सा मिळतो. अनौरस संततीला वडीलांचा हिस्सा मिळत नाही. पण आईचा मिळतो. मनुष्यवध करणाऱ्या व्यक्तीस वारसाधिकार मिळत नाही.

☞ **हनाफी (सुन्नी) वारसा नियम:**

वारसदारांचे सात वर्ग : हनाफी नियमानुसार वारसांचे सात वर्ग आहेत. त्यापैकी तीन वर्ग प्रमुख असून चार दुय्यम वर्ग आहेत.

**तीन प्रमुख वर्ग:** (१) हिस्सेदार (२) अवशिष्टग्राही (३) दूरचे नातेवाईक.

या तीन प्रमुख वर्गामध्ये गोत्रज असोत किंवा भिन्नगोत्रज असे मृताचे सर्व रक्तसंबंधी समाविष्ट आहेत. त्यांच्याशिवाय नवरा किंवा बायको ही विवाहाने नातेवाईक झालेली व्यक्तीही येते. वरील तीन वर्गात कोणी वारस नसल्यास अपवाद म्हणून दुय्यम वारसदार उत्तराधिकारी होतात.

**चार दुय्यम वर्ग:** (४) संविदानिर्मित उत्तराधिकारी (५) अभिस्वीकृत नातेवाईक (६) एकमेव उत्तरदानग्राही (७) वरील (४) ते (६) यांच्या अभावी सरकार.

**<u>तीन प्रमुख वर्ग:</u>**

**(१) हिस्सेदार:** या वर्गामध्ये मृताचे काही निकटचे नातेवाईक येतात. त्यांना पवित्र कुराणान्वये विनिर्दिष्ट हिस्सा देण्यात आलेला आहे म्हणून त्यांना प्रमुख वारसदार म्हणतात. नवरा आणि बायको हे विवाहसंबंधाने झालेले नातेवाईक धरून हिस्सेदारांची संख्या बारा आहे.

या हिस्सेदारांपेक्षा अवशिष्टग्राही या दुसऱ्या वर्गातील वारसदारांचे स्थान अधिक किफायतशीर आहे. अवशिष्टग्राही अस्तित्वात असतील तर या हिस्सेदारांना त्यांच्या ठराविक हिश्यापलीकडे मृताच्या संपदेत काहीही मिळत नाही. एकाच वेळी अनेक हिस्सेदार अस्तित्वात असण्याचा संभव कमी असतो.
या एकूण बारा हिस्सेदारांपैकी आठ हिस्सेदार स्त्रिया आहेत. अनेकदा संपदेचा अधिकांश हिस्सा अवशिष्टग्राहींसाठी शिल्लक राहतो, त्यांच्यापैकी बहुतेक सर्व पुरुष आहेत. तेव्हा स्त्रियांची तरतुद व्हावी आणि त्यांना मृताच्या संपदेत काहीतरी वाटा मिळावा या उद्देशाने हिस्सेदारांच्या यादीत स्त्रीयांचा बहुसंख्येने अंतर्भाव केलेले आहे. उदाहरणार्थ- एक मुसलमान व्यक्ती मृत झाल्यानंतर त्याच्या मागे एक विधवा आणि एक मुलगा असे वारसदार असले तर विधवा हिस्सेदार असल्यामुळे तिला १/८, आणि मुलगा अवशिष्टग्राही असल्यामुळे त्याला उर्वरित ७/८ हिस्सा मिळतो. विधवा हिस्सेदार नसती तर तिला काहीच मिळाले नसते.

**(२) अवशिष्टग्राही:** या वर्गांत चार अपवाद सोडल्यास, फक्त गोत्रज पुरुष येतात. उदाहरणार्थ, बाप, बापाचा बाप, त्याचा बाप इत्यादी पुरुष पूर्वज, पुत्र, त्याचा पुत्र, त्याच्या पुत्राचा पुत्र असे स्वत:चे, बापाचे वगैरे पुरुष वंशज, कन्या आणि बहीण वगैरे. मयताची सर्व संपदा हिस्सेदारांचे हिस्से देण्यात संपली तर अवशिष्टग्राही या दुसऱ्या वर्गातील वारसदारांना काहीही मिळणार नाही. हिस्सेदार नसतील तर मृताची सर्व संपदा आणि ते असतील तर विनिर्दिष्ट हिस्सा वजा जाता उरलेली संपदा अवशिष्टग्राहींमध्ये विभागली जाते. हिस्सेदार अस्तित्वात असुन कोणीही अवशिष्टग्राही नसतील तर सर्व संपदा 'प्रत्यावर्तनाच्या तत्वाने' हिस्सेदाराकडे जाते.

**(३) दूरचे नातेवाईक:** जो हिस्सेदारही नाही आणि अवशिष्टग्राहीही नाही असा नातेवाईक म्हणजे दूरचा नातेवाईक होय. या वर्गात सर्व भिन्न गोत्रज आणि हिस्सेदारांच्या वर्गात येणाऱ्या स्त्रिया सोडून बाकीच्या गोत्रज स्त्रिया यांचा समावेश होतो. हिस्सेदार आणि अवशिष्टग्राही नसतील तरच संपदा दूरच्या नातेवाईकांकडे जाते.

**दुय्यम वर्ग (वारसदार):** यांचे चार प्रकार आहेत. वर उल्लेखलेल्या तीन वर्गातील वारसदार नसतील तर मृताची संपदा दुय्यम वारसदारांकडे जाते. त्यापैकी वरच्या वर्गाचा वारसदार खालच्या वर्गाच्या वारसदाराला अपवर्जित करतो.

**(४) संविदानिर्मित वारसदार:** हनाफी कायद्यान्वये संविदेमुळेसुद्धा वारसाधिकार प्राप्त होत होते. मालकाकडून देय असलेला द्रव्यदंड किंवा खंडणी मालकाऐवजी तिऱ्हाईत इसमाने दिल्यास मालकाच्या मृत्यूनंतर तो तिऱ्हाईत इसम त्या संपदेचा मालक होईल अशी संविदा तिऱ्हाईत इसम आणि मालक यांच्यामध्ये झाली तर अशा संविदेखाली वारसाधिकार उत्पन्न होत असे. परंतू आता या प्रकाराला केवळ ऐतिहासिक महत्वच राहिले आहे.

**(५) अभिस्वीकृत नातेवाईक:** मुस्लिम व्यक्ती, त्याच्या मृत्यूपूर्वी, त्याच्या हयातीत कोणत्याही अज्ञात कुळातील व्यक्तीला आपला वारसदार म्हणून अभिस्वीकृत करू शकतो. त्याला अभिस्वीकृत नातेवाईक म्हणतात. पण ते नाते दुसऱ्यांच्याद्वारे असावे लागते, स्वत:च्याद्वारे असता कामा नये. तो ति-हाइताला भाऊ किंवा पुतण्या म्हणून, म्हणजे अनुक्रमे बापाचा मुलगा आणि चुलत्याचा मुलगा म्हणून अभिस्वीकृत करु शकतो, पण तो त्याला स्वत:चा मुलगा म्हणून अभिस्वीकृत करु शकत नाही. अशी अभिस्वीकृत व्यक्ती पाचव्या वर्गाची वारसदार होते.

**(६) एकमेव उत्तरदानग्राही:** वरच्या वर्गांपैकी कोणीही अस्तित्वात नसल्यास, मृत्युपत्रकर्ता आपली सर्व संपदा कोणाही व्यक्तीला मृत्यूपत्राने दान करू शकतो. अशा व्यक्तीला एकमेव उत्तरदानग्राही असे म्हणतात.
मुस्लिम मृत्यूपत्रकर्ता व्यक्तीला जर वारसदार असतील तर आपल्या संपत्तीपैकी १/३ पेक्षा अधिक संपत्तीदानाचे मृत्यूपत्र तो करु शकत नाही. त्याला वारसदार नसतील तर तो आपली सर्व संपत्ती मृत्यूपत्राने देऊ शकतो.

**(७) सरकार:** मृत मुस्लिम व्यक्तीला कोणीही वारसदार किंवा उत्तरदानग्राही नसल्यास त्याची संपदा सरकार जमा होते. मूळ मुस्लिम विधीखाली अशा परिस्थितीत संपदा मुस्लिम समाजाच्या लाभासाठी सार्वजनिक खजिन्यात जमा होत असे.

☛ **मुस्लिम विधवा:** मुस्लिम धर्मात विधवेला वारस म्हणून डावलता येत नाही. आपत्यहीन विधवेलाही मयत नवऱ्याच्या मिळकतीत, अंत्यविधी, कर्ज आणि इतर कायदेशीर खर्च भागविल्यानंतर १/४ हिस्सा मिळतो. तथापि, आपत्ये किंवा नातवंडे असलेल्या विधवेला मयत नवऱ्याच्या मिळकतीत, अंत्यविधी, कर्ज आणि इतर कायदेशीर खर्च भागविल्यासनंतर १/८ हिस्सा मिळतो.
परंतू जर एखाद्या मुस्लिम व्यक्तीने आजारपणात त्याची सेवा करणाऱ्या एखाद्या स्त्रीशी लग्न करण्याचा विचार केला असेल परंतू धर्मानुसार लग्नाबाबतची परिपूतर्ता करण्याआधी तो, त्या आजारपणात मयत झाला तर अशा स्त्रीला वारस म्हणून हिस्सा मिळत नाही. तथापि, अशा आजारी व्यक्तीने आजारपणात बायकोला घटस्फोट दिला आणि नंतर तो त्या आजारपणात मयत झाला तर त्याच्या बायकोला नवऱ्याच्या मिळकतीत वारस म्हणून हिस्सा मिळतो आणि तिचा हा वारसाधिकार, ती पुनर्विवाह करीत नाही तोपर्यंत चालू राहतो.

**व्याख्या:**

**(१) आजा आणि आजी:** आजा आणि आजी यांच्या व्याख्या वैशिष्ट्यपूर्ण आहेत, आपण नेहमी वडीलांच्या वडीलांना आजा म्हणतो आणि आईच्या वडीलांनाही आजा म्हणतो. परंतू प्राचीन अरब समाजात जाज्वल्य वंशाभिमान असल्याने ते दोन प्रकारच्या आजोबांमध्ये फरक करतात. 'आजा' ला अरब भाषेत 'जद्द' म्हणतात. अरब लोक वडीलांच्या वडीलांना 'जद्द सहीहू' म्हणतात. 'सहीह' म्हणजे ज्याला आपण मराठीत 'सहीसही' किंवा अगदी तंतोतंत म्हणतो असा अर्थ होतो.
आईच्या वडीलांना 'जद्द फासीद' असे म्हणतात. 'फासीद' म्हणजे अगदी तंतोतंत नसणारे किंवा ज्यात काहीतरी कमतरता आहे असे.
मुस्लिम विधीवर ग्रंथ लिहिणाऱ्यांनी 'सहीह' ला खरे आणि 'फासीद' ला खोटे असे शब्द वापरले आहेत.
मुस्लिम कायद्याच्या बाबतीत आणखी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. ती म्हणजे पणजा, खापरपणजा किंवा निपणजा हे शब्द वरच्या पिढीतील पूर्वजांना आणि पणतू, खापरपणतू हे शब्द खालच्या पिढीतील वंशजांना न वापरता त्यांना अनुक्रमे आजा (कितीही वरचा म्हणजे वरच्या पिढीतील) आणि नातू (कितीही खालचा म्हणजे खालच्या पिढीतील) असेच म्हणतात. आजी आणि नातू यांच्या बाबतीत तशीच शब्दयोजना करतात.

**(२) सहीह आजा :** म्हणजे तो आजा आणि मृत यांच्या नात्यामध्ये एकही स्त्री दुवा असत नाही असा पूर्वज.

**(३) सहीह आजी** : म्हणजे ती आजी आणि मृत यांच्या नात्यामध्ये फासीद आजा बसत नाही अशी पूर्वज स्त्री.

**(४) फासीद आजा** : म्हणजे तो आजा आणि मृत यांच्या नात्यामध्ये एखादा तरी स्त्री दुवा असतो असा पूर्वज.

**(५) फासीद आजी** : म्हणजे ती आजी आणि मृत यांच्या नात्यामध्ये एखादा तरी फासीद आजा बसतो अशी पूर्वज स्त्री.

☛ **पुत्र**: हा प्रथम क्रमांकाचा अवशिष्टग्राही आहे. मुस्लिम विधीखाली हिस्सेदारांची अशा युक्तीने रचना केली आहे की, पुत्र हा केव्हाही अपवर्जित केला जाणार नाही परंतू पुत्र असल्यास काही वारसदार पुर्णपणे अपवर्जित होतात, काहींचे हिस्से घटतात आणि काही हिस्सेदार अवशिष्टग्राही होतात.
पुत्र असल्यास कन्या अवशिष्टग्राही होते आणि तिला पुत्राच्या अर्धा हिस्सा हिस्सा मिळतो.

☛ **वितरणाची आणि अपवर्जनाची तत्वे**
**नियम १:** हिस्सेदार आणि अवशिष्टग्राही या दोन वर्गातील कोणीही नातेवाईक नसतील तरच दूरच्या नातेवाईकांकडे वारसा जातो. मात्र हिस्सेदारांच्या यादीत पती आणि पत्नी असले तरी त्यांच्याबरोबर दूरचे नातेवाईक वारसदार होऊ शकतात.
**नियम २**: दूरच्या वारसदारांत, वंशज, पूर्वज, आणि सांपार्श्विक असे तीन गट आहेत. त्यांच्यापैकी वंशज पूर्वजांना अपवर्जित करतात, आणि पूर्वज सांपार्श्विकांना अपवर्जित करतात.
**नियम ३**: वंशजांमध्ये अग्रक्रम खालील दोन नियमांनी ठरविला जातो.
१) अधिक नजीकचा नातेवाईक अधिक दूरच्या नातेवाईकाला अपवर्जित करतो. कन्येचा पुत्र किंवा कन्येची कन्या यांना पुत्राच्या कन्येच्या कन्येपेक्षा वरचा क्रम मिळतो. कन्येचा पुत्र किंवा कन्येची कन्या हे सर्वात नजीकचे असे दूरचे नातेवाईक असल्यामुळे ते इतर सर्व दूरच्या नातेवाईकांना अपवर्जित करतात.
२)एकाच श्रेणीतील अनेक नातेवाईक असतील तर हिस्सेदार आणि अवशिष्टाग्राही यांच्या अपत्यांना दूरच्या नातेवाईकांच्या अपत्यापेक्षा वरचा क्रम मिळतो. उदाहरणार्थ, पुत्राच्या कन्येची कन्या आणि कन्येच्या कन्येचा पुत्र यांच्यामध्ये पुत्राच्या कन्येची कन्येला वरचा क्रम मिळतो. याचे कारण तिची आई म्हणजे पुत्राची कन्याही हिस्सेदार आहे, तर दुसऱ्याची आई असणारी कन्येची कन्या ही दूरची नातेवाईक आहे.

☛ **सावत्र अपत्ये** : सावत्र अपत्ये आणि सावत्र आईबाप हे एकमेकांचे वारसदार होत नाहीत.

☛ **अनौरस अपत्य:** विवाहबाह्य अपत्य हे फक्त त्याच्या आईचे अपत्य आहे असे मानण्यात येते. अपत्याला आईचा आणि आईकडूनच्या नातेवाईकांचा वारसा मिळतो आणि आई आणि तिचे नातेवाईक यांना अनौरस अपत्यांचा वारसा मिळतो. त्यात पिता आणि त्याचे नातेवाईक आणि अनौरस पुत्र यांच्यामध्ये परस्पर वारसाधिकार मिळत नाही. एका स्त्रीला औरस आणि अनौरस पुत्र असतील तर अनौरस पुत्र औरस पुत्राचा वारस होऊ शकत नाही असे अलाहाबाद उच्च न्यायालयाने म्हटले आहे.
एक सुन्नी स्त्री मयत झाली आणि तिचा पती आणि तिच्या बहिणीचा अनौरस पुत्र असे नातेवाईक तिच्या मागे असतील तर तिच्या पतीला हिस्सेदार या नात्याने औरस अपत्य नसल्यामुळे अर्धा हिस्सा मिळतो, आणि बहिणीच्या पुत्राला, तो अनौरस असला तरी, तो मृताच्या आईच्या द्वारा नातेवाईक झाल्यामुळे उरलेला अर्धा हिस्सा मिळतो.

☛ पती-पत्नी: हे दोघेही विवाहसंबंधामुळे हिस्सेदारांच्या यादीत आले आहेत. स्त्री मृत झाली आणि तिच्या मागे तिचा पती आणि अपत्ये किंवा कितीही खालच्या पुत्राची अपत्ये राहिली तर पतीला १/४ हिस्सा मिळतो आणि असे नसलेतर १/२ हिस्सा मिळतो. या उदाहरणात पती आणि पत्नी यांच्या जागांची उलटापालट केली

तर पत्नीला अनुक्रमे १/८ किंवा १/४ हिस्सा मिळतो. पत्नी अनेक असल्यास त्यांच्यामध्ये १/८ किंवा १/४ हिस्सा समप्रमाणात विभागला जाईल.

बापाप्रमाणे आईलाही काही झाले तरी हिस्सा मिळतोच. पण दोन्ही बाजूच्या आज्या काही परिस्थितीत पूर्णपणे अपवर्जिल्या जातात. आई, अधिक नजीकची पैतृक किंवा मातृक आजी, बाप अधिक नजीकचा सहीह आजा यांच्यापैकी कोणीही असल्यास पैतृक आजी अपवर्जिली जाते. आई किंवा अधिक नजीकची पैतृक किंवा मातृक आजी असल्यास मातृक आजी अपवर्जिली जाते.

☛ कन्या- काहीही झाले तरी कन्या वारसदार होतेच. एकच कन्या असेल तर तिला १/२ हिस्सा मिळतो. पण दोन किंवा अधिक कन्या असल्यास त्यांना सर्वांना मिळून २/३ हिस्सा मिळतो. मृत व्यक्तीला पुत्र असल्यास कन्या अवशेषग्राही होते. पुत्राला तिच्या दुप्पट हिस्सा मिळतो.

☛ बहीण- बहीणीच्या अस्तित्वामुळे कन्या अपवर्जित होत नाही. मृताला एक कन्या आणि एक बहीण असल्यास कन्येला हिस्सेदार म्हणून तिचा १/२ हिस्सा व बहीणीला उत्तरदानग्राही म्हणून १/२ हिस्सा मिळतो. त्याचप्रमाणे दोन कन्या आणि दोन बहिणी असल्यास, दोन कन्यांना मिळून २/३ हिस्सा, हिस्सेदार म्हणून मिळतो.

☛ पुत्राची कन्या- पुत्र किंवा कन्या यांच्यापैकी कोणीही नसेल तर पुत्राच्या कन्येला १/२ हिस्सा, आणि पुत्राच्या दोनपेक्षा अधिक कन्या असतील तर त्यांना २/३ हिस्सा मिळतो. मात्र काही परिस्थितीत पुत्राच्या कन्येचा हिस्सा १/६ होतो आणि समान पुत्राचा पुत्र असल्यास ती अवशिष्टग्राही होते. पण पुत्राची कन्या आणि पुत्राची कन्येची कन्या असल्यास त्यांना मिळून २/३ हिस्सा मिळतो.

☛ सहोदर भाऊ किंवा सहोदर बहिण- हे प्राथमिक वारसदार नव्हेत. त्या दोघांनाही प्रत्येकी १/६ हिस्सा मिळतो. दोन सहोदर भाऊ किंवा सहोदर बहिणी असल्यास सहोदर भावाचा १/३ आणि सहोदर बहिणीचा १/३ हिस्सा असतो.
दोन सहोदर भावांमध्ये वारसाधिकार उत्पन्न होण्यासाठी ते दोघेही औरस असावे लागतात. एका स्त्रीला एक औरस आणि एक अनौरस असे दोन पुत्र झाले तर ते दोघे सहोदर भाऊ होत नाहीत आणि ते एकमेकांचे वारसदार होत नाहीत.

☛ पती, पत्नी, बाप, आई आणि कन्या हे प्राथमिक वारसदार असून ते कधीही संपूर्णतः अपवर्जित होत नाहीत. काही बाबतीत त्यांचा हिस्सा वाढतो किंवा ते अवशिष्टग्राही होतात.
☛ हिस्सेदार किंवा अवशिष्टग्राही यांच्यापैकी कोणीही वारस असल्यास दूरचे वारसदार अपवर्जित होतात. याला अपवाद पती आणि पत्नी. ते असले आणि हिस्सेदार आणि अवशिष्टग्राही यांच्यापैकी दुसरे कोणीही वारस नसले तरी पतीपत्नीचे हिस्से वजा जाता बाकी संपदा दूरच्या वारसदारांकडे जाते.

☛ सर्वसाधारणपणे, नजीकचे वारसदार दूरच्या वारसांना अपवर्जित करतात.
कन्या ही पुत्राच्या कन्येच्या मानाने वरच्या श्रेणीतील, पण ती पुत्राच्या कन्येला संपूर्णपणे अपवर्जित करीत नाही. एकटी कन्या असल्यास ती पुत्राच्या कन्येचा हिस्सा १/२ च्या ऐवजी १/६ करते.

☞ प्रत्यावर्तन: सर्व हिस्सेदारांचे हिस्से दिल्यानंतर संपदेचा काही भाग शिल्लक राहिला आणि कोणीही अवशिष्टग्राही वारस नसेल तर तो उर्वरित भाग परत हिस्सेदारांकडे येतो आणि तो हिस्सेदारांमध्ये त्यांच्या त्यांच्या हिश्श्याप्रमाणे विभागला जातो. या परत येण्याच्या क्रियेला पारिभाषिक शब्दात 'प्रत्यावर्तन' म्हणतात. हिस्सेदारांच्या यादीतील अस्तित्वात असलेल्या सर्व हक्कदार वारसदारांचे ठराविक हिस्से दिल्यानंतर उर्वरित सर्व संपदा अवशिष्टग्राहींकडे येते. त्यांच्यापैकी एक व्यक्ती जरी असली तरी उर्वरित संपदा हिस्सेदारांकडे परत येत नाही. पण अवशिष्टग्राहींपैकी कोणीही नसेल तर तो उर्वरित भाग दूरच्या नातेवाईकांकडे न जाता परत हिस्सेदारांकडे येतो. याबाबतीत अपवाद पती आणि पत्नी. अवशिष्टग्राहींपैकी कोणीही नसेल आणि पती किंवा पत्नी हिस्सेदार असतील तर उर्वरित संपदा पती किंवा पत्नी यांच्याकडे परत न येता दूरच्या नातेवाईकांकडे जाते. पण अवशिष्टग्राही नसतील आणि दूरचे नातेवाईकही नसतील आणि पती किंवा पत्नी किंवा दोघेही इतकेच वारसदार असतील तर मात्र संपदा त्यांच्याकडे, तिच्याकडे किंवा दोघांकडे परत येईल. अशावेळी संपदा सरकारजमा होत नाही.

☞ अवशिष्टग्राहींची खालीलप्रमाणे गटवारी केली आहे.
पुरुष: गट क्र. १- गोत्रज (स्वत:च्या अधिकारांत)
गट क्र. २- गोत्रज (चार नात्यातील स्त्रिया (दुसऱ्यांमुळे)
क) कन्या (पुत्राबरोबर)
ख) पुत्राची कन्या (कितीही वरील समान पुत्राच्या पुत्राबरोबर)
ग) सख्खी बहीण (सख्या भावाबरोबर)
घ) रक्तसंबंधी बहीणी (रक्तसंबंधी भावाबरोबर)

गोत्रज' या गटात, १)वंशज, २) पूर्वज, ३)बापाचे वंशज, आणि ४)पैतृक आजा (कितीही वरचा) याचे वंशज असे प्रकार केलेले आहेत. यापैकी (३) आणि (४) सांपर्श्विक आहेत.
गोत्रजांमध्ये अग्रक्रम ठरवताना एक गोष्ट लक्षात ठेवायची म्हणजे, वंशज पूर्वजांना अपवर्जित करतात आणि पूर्वज सांपार्श्विकांना. अपवर्जित सांपार्श्विकांमध्ये बापाचे वंशज आज्याच्या वंशजांना अपवर्जितात आणि अशा रीतीने अधिक जवळच्या आज्याचे वंशज अधिक दूरच्या आज्याच्या वंशजांना अपवर्जित करतात.

⁕ बक्षीस (हिबा): मुस्लिम कायद्यान्वये बक्षिसाला 'हिबा' म्हणतात. जी मुस्लिम व्यक्ती वडिलोपार्जित स्थावर/जंगम मालमत्ता धारण करीत असेल ती व्यक्ती, इतर सहधारकांची 'हिबा' साठी संमती नसली तरीही त्याची स्थावर/जंगम मिळकत 'हिबा' म्हणून देऊ शकेल.
रक्तसंबंधी नात्यामध्ये केलेल्या तोंडी 'हिबानामा' होऊ शकतो.
'हिबानामा' साठी आवश्यक असलेल्या अटी म्हणजे (१) 'हिबा' देणाऱ्याची इच्छा व त्याचे प्रकटीकरण (२) ज्याला 'हिबा' द्यावयाचा आहे त्याची अथवा त्याच्या वतीने दुसऱ्याची संमती. (3) जी मालमत्ता 'हिबा' द्यावयाची आहे त्या मालमत्तेचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष ताबा दिला पाहिजे. यापैकी एकही गोष्ट घडली नाही तर 'हिबा' व्यवहार अवैध ठरतो.

## शियापंथीय संप्रदायाच्या विधीखालील वारसा

**☞ शिया विधिज्ञ वारसदारांचे दोन गट करतात:**

**१)** रक्तसंबंधी म्हणजे रक्तसंबंधामुळे झालेले वारसदार. यांच्यामध्ये गोत्रज आणि भिन्न गोत्रज यांचा समावेश होतो.
**२)** विशेष बाह्य कारणामुळे झालेले वारसदार. या गटात विवाहामुळे झालेले नातेवाईक म्हणजे पती/ पत्नी यांचा समावेश होतो.

☞ **रक्तसंबंधी वारसदारांचे वर्ग:**
**(१)** रक्तसंबंधी वारसदाराचे तीन वर्ग असून प्रत्येक वर्गात दोन विभाग आहेत:
✓ वर्ग- १- विभाग (१) आईवडील; विभाग (२) अपत्ये आणि सरळ रेषेतील वंशज (कितीही खालचे).
✓ वर्ग २- विभाग (१) आजा आजी (कितीही वरचे) विभाग (२) भाऊ आणि बहिणी आणि त्यांचे वंशज (कितीही खालचे)
✓ वर्ग ३- विभाग (१) चुलते आणि आत्या, आणि मृताच्या आईबापाचे आणि कितीही वरच्या आजाआजींचे चुलतेआणि आत्या आणि त्यांचे कितही खालचे वंशज. विभाग (२) मामा आणि मावशा, आणि मृताच्या आईबापाचे आणि कितीही वरच्या आजाआजींचे मामा आणि मावशा आणि त्यांचे कितीही खालचे वंशज.

वरील तीन वर्गापैकी पहिला वर्ग दुसऱ्या वर्गाला आणि दुसरा वर्ग तिसऱ्या वर्गाला अपवर्जित करतो. प्रत्येक वर्गाच्या दोन विभागांत एक विभाग दुसऱ्या विभागाला अपवर्जित करीत नाही. दोन्ही विभागांना मिळून वारसा मिळतो. पण प्रत्येक विभागात अधिक नजीकच्या श्रेणीतील वारसदार अधिक दूरच्या श्रेणीतील वारसदारांना अपवर्जित करतात.

♣ हनाफी विधीखाली हिस्सेदार आणि अवशिष्टग्राही दूरच्या नातेवाईकांना अपवर्जितात,
▲ शिया विधीखाली ते सर्व सहवारसदार आहेत.
♣ हनाफी विधीप्रमाणे भिन्न गोत्रजांपेक्षा गोत्रजांना अग्रक्रम मिळतो,
▲ शियाविधीखाली गोत्रज आणि भिन्न गोत्रज हा फरकच नाही. शियापंथीय विधीखाली सर्वात नजीकच्या नातेवाईकाला अग्रक्रम मिळतो.
♣ शिया विधीमध्ये हिस्से निश्चित करण्यासाठी फक्त दोन वर्ग करतात. एक हिस्सेदारांचा आणि दुसरा अवशिष्टग्रहींचा.
▲ हनाफी विधीखाली दूरचे नातेवाईक हा आणखी एक वर्ग आहे, तो शिया विधीखाली नाही.

☞ **हिस्सेदार:** शिया विधिज्ञ वारसदारांचे नऊ हिस्सेदार असल्याचे मानतात.
१ आणि २: नवरा आणि बायको: हे विवाहसंबंधामुळे वारसदार झाले आहेत.
३, ४ आणि ५: बाप, आई आणि कन्या: हे रक्तसंबंधामुळे झालेल्या वारसदारांपैकी पहिल्या विभागातील आहेत.
६, ७, ८ आणि ९: सहोदर भाऊ, सहोदर बहीण, सख्खी बहीण आणि रक्तसंबंधी बहीण. हे दुसऱ्या वर्गातील दुसऱ्या विभागाचे आहेत.

☞ **हिस्सेदारांचे वंशज:** शिया विधिज्ञ हिस्सेदारांचे वंशज हिस्सेदार होतात असे मानतात तथापि, तो नियम १) कन्या, २) सहोदर भाऊ, ३) सहोदर बहीण, ४) सख्खी बहीण, आणि ५) रक्तसंबंधी बहीण या पाच हिस्सेदारांपुरताच लागू होते. बाकी चौघांचे बाबतीत (पती, पत्नी आणि आई) यांच्या बाबतीत लागू होत नाही. या चौघांचे वंशज हिस्सेदार होत नाहीत.

☞ शाखावार वितरण: शिया विधीखाली वारसदारांच्या तीन वर्गांपैकी प्रत्येक वर्गात प्रतिशाखा वितरण केले जाते. व्यक्तिवार नाही.
याचा अर्थ असा की, मृताला एकापेक्षा अधिक पुत्र असतील आणि त्या पुत्रांनाही पुत्र असतील तर सर्व नातवांना सारखे हिस्से न देता नातू ज्यांच्याद्वारे वारस झाले ते म्हणजे मृताचे पुत्र जिवंत आहेत असे कल्पून त्याचे हिस्से ठरवायचे आणि मग त्या पुत्राचे हिस्से त्यांच्या त्यांच्या पुत्रांमध्ये विभागायचे.

**काही संकीर्ण तरतुदी**:
**१) सरकारजमा** : नातेवाईक वारसदारांपैकी कोणीही जिवंत नसल्यास, मृताची संपदा सरकारजमा होते.
**२) अनौरस अपत्य**: अनौरस अपत्यांना वारसाधिकार आहे किंवा कसे याबद्दल मतभेद आहे. एक मत असे आहे की अनौरस अपत्ये फक्त आईचे वारसदार होतात, त्यांना बापाचा वारसा मिळत नाही. दुसरे मत असे की व्याभिचारातून जन्माला आलेल्या अपत्यांना आईचासुद्धा वारसा मिळत नाही बापाचा तर नाहीच नाही. मुल्लांच्या मते या बाबतीत विधी असा आहे की, अनौरस अपत्याला आईचासुद्धा वारसा मिळत नाही आणि आई किंवा तिचे नातेवाईक यांना अनौरस अपत्यांचा वारसा मिळत नाही.
**३) दोन किंवा अधिक नाती**: एखादी व्यक्ती दोन नात्यांमुळे मृताची वासरदार असेल तर त्या व्यक्तीला दोन्ही नात्यांनी वारसाधिकार मिळतो. एका स्त्रीने आपल्या चुलत भावाशी विवाह केला. पुढे ती मयत झाली. तिच्या पतीला पती म्हणून एक आणि चुलत भाऊ म्हणून एक असा दुहेरी हिस्सा मिळतो.
**४) मनुष्यवध**: एखाद्या मनुष्याने मृताचा वध उद्देशपूर्वक केला असेल तरच त्याचा वारसाधिकार शिया विधीखाली नष्ट होतो.

* **वक्फ अधिनियम १९५५**: इस्लाम धर्माच्या धार्मिक कामाकरिता वापरण्यात येणाऱ्या सर्व मिळकती (मशिद, इदगाह, दर्गा, मकबरा, कब्रस्तान, धार्मिक उपासना संस्था) वक्फ कायद्याखाली येतात.
धार्मिक किंवा धर्मदाय संस्थेमध्ये सहभागी होण्याचा अधिकार असलेली कोणत्याही व्यक्तीचा समावेश वक्फमध्ये स्वारस्य असणारी व्यक्ती म्हणून होतो. केंद्र शासनाने १ जानेवारी १९९६ पासून वक्फ अधिनियम १९९५ चा अंमल सुरु केला आहे. वक्फ अधिनियम १९९५, कलम ५६ अन्वये वक्फ मंडळाच्या परवानगीशिवाय वक्फची मालमत्ता भाडेपट्ट्याने देता येणार नाही. सात-बारा उताऱ्यावर वक्फ मालमत्तेसंबंधी कोणत्याही व्यवहाराबाबत महाराष्ट्र वक्फ मंडळाचा ना हरकत दाखला आवश्यक आहे.

## मुस्लिम व्यक्तीचे मृत्यूपत्र

भारतीय वारसा कायदा, १९२५, कलम ५८ अन्वये हा कायदा मुस्लिम व्यक्तीच्या मृत्यूपत्राबाबत (वसियतनामा) लागू होत नाही. मुस्लिम धर्मिय व्यक्तींसाठी मृत्यूपत्राबाबतच्या तरतूदी त्यांच्या 'हेदाय' या बाराव्या शतकातील अधिकृत ग्रंथात दिलेल्या आहेत. यासंबंधात दुसरा ग्रंथ 'फतवा आलमगिरी' हा सतराव्या शतकात लिहिण्यात आला. 'शराय-उल-इस्लाम' हा ग्रंथ प्रामुख्याने शिया पंथीय मुस्लिमांसाठी आहे.

☞ **स्वाक्षरी:** मुस्लिम धर्मिय व्यक्तीने केलेल्या मृत्यूपत्रावर स्वाक्षरी केली नसेल किंवा त्यावर साक्षीदारांचे साक्षांकन नसले तरी ते मत्यूपत्र वैध मानले जाते.

☞ **सज्ञानता:** मुस्लिम कायद्यानुसार पुरूष व्यक्ती १५ वर्षे वयाचा झाल्यावर त्याला सज्ञान समजले जाते. इंडियन मेजॉरिटी ॲक्ट, १८७५ अन्वये पुरूष व्यक्ती १८ वर्षे वयाचा झाल्यावर त्याला सज्ञान समजतात परंतू जर अशी व्यक्ती अज्ञान असतांना न्यायालयाने त्याच्याबाबत 'पालक' नेमला असेल तर अशी व्यक्ती २१ वर्षे वयाचा झाल्यावर त्याला सज्ञान समजतात. इंडियन मेजॉरिटी ॲक्ट, १८७५ हा सर्वधर्मियांना लागू असल्याने मुस्लिम पुरूष व्यक्ती १८ वर्षे वयाचा झाल्यावर सज्ञान समजली जाते. १५ वर्षे वयाची सज्ञानता केवळ विवाह, तलाक. मेहेर यांसाठीच लागू आहे.

☞ **गर्भस्थ शिशू:** मुस्लिम धर्मानुसार त्याच व्यक्तीच्या नावे मृत्यूपत्र करता येते जी मृत्यूपत्र करणाऱ्या व्यक्तीच्या मृत्यूच्यावेळी जीवित असेल. तथापि, मृत्यूपत्र करण्याच्यावेळी गर्भात असणाऱ्या शिशूचा जन्म मृत्यूपत्र करणाऱ्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर सहा महिन्यात झाला तर त्याच्या नावे केलेले मृत्यूपत्र ग्राह्य मानले जाते.

☞ **मर्ज-उल-मौत:** मुस्लिम धर्मिय व्यक्तीला त्याचा दफन खर्च व कर्ज फेडीसाठी आवश्यक रक्कम सोडून, त्याच्या संपत्तीच्या १/३ संपत्तीपुरते मृत्यूपत्र कोणत्याही वारसांच्या संमतीशिवाय करता येते. १/३ संपत्तीपेक्षा जास्त संपत्तीचे मृत्यूपत्र वारसांच्या संमतीनेच वैध होते.

☞ **प्रोबेट:** भारतीय वारसा कायदा, १९२५ चे कलम २१३ मुस्लिम व्यक्तीला लागू होत नाही. त्यामुळे त्यांना प्रोबेटची आवश्यकता नाही.

☞ **अमान्य तत्व:** मुस्लिम कायद्याला अविभक्त कुटुंब, मृत व्यक्ती मागे जिवंत असणारे, वारसा हक्क, जन्मसिध्द हक्क, ज्येष्ठ मुलाचा हक्क अशी तत्वे मान्य नाहीत. एखाद्या व्यक्तीचा मुलगा, त्या व्यक्तीच्या जिवंतपणी मयत झाला तर मयताच्या मुलाला मालमत्तेत कोणताही हक्क नसतो.
पवित्र कुराणात, सर्व रक्त संबंधी, लग्नामुळे झालेले संबंधी हे जवळचे वारस (शेअरर) मानले जातात.
मुस्लिम कायद्यान्वये पवित्र कुराणात ठरवून दिल्याप्रमाणे सर्व वारसांना हिस्सा मिळतो.
मुस्लिम सुन्नी हनफी कायद्यानुसार मुस्लिम व्यक्ती मयत झाल्यानंतर त्याच्या पत्नीला मयत व्यक्तीच्या मालमत्तेतील १/८ ठराविक हिस्सा मिळतो. मयत मुस्लिम व्यक्तीस दोन पत्नी असतील तर प्रत्येक पत्नीला १/१६ हिस्सा मिळतो. मयताला मुले असतील तर मुलाला दोन हिस्से आणि मुलीला एक हिस्सा मिळतो.

☞ **अपात्रता:** मुस्लिम कायद्यान्वये ज्या व्यक्तीने आत्महत्त्या करण्यासाठी विष प्राशन केले असेल किंवा स्वत:ला जखमी करुन घेतले असेल अशा व्यक्तीला वसियतनामा करण्याचा अधिकार नसतो.